**Scholarly Research Journal for Humanity Science & English Language,**
***Online ISSN 2348-3083, SJ IMPACT FACTOR 2019: 6.251, www.srjis.com***
*PEER REVIEWED & REFEREED JOURNAL, FEB-MAR, 2020, VOL- 8/38*

# स्त्रीवादाचे सामाजिक पैलू : निर्णय प्रक्रियेतील वास्तवता

**सुजाता कराडे, Ph. D.**
*सहयोगी प्राध्यापक, विभाग प्रमुख, समाजशास्त्र महिला सी.बी.शहा महिला महाविद्यालय, रतनशी नगर, सांगली.*

*Scholarly Research Journal's is licensed Based on a work at www.srjis.com*

आज जगामध्ये स्त्रिया निरनिराळ्या क्षेत्रांमध्ये कार्यरत राहून जिवंत जगत असल्या तरी स्त्री पुरुष समानता आणि स्त्रियांचे हक्क हे आजही जागतिक आहेत. कारण स्त्री ही कोणत्याही समाजातील असो तिला समानता नाकारण्यात आली आहे. स्त्रियांचे प्रश्नांचे स्वरूप हे प्रतिनिधिक असे असले तरी निरनिराळ्या सामाजिक घटकांमध्ये जगण्यात स्त्रियांची सामाजिक स्थिती ही त्यांच्या विविध प्रश्नातून आणि त्यांच्या संघर्षातून स्पष्ट होते कारण प्रत्येक समाजरचनेतील पुरुषी शाही व्यवस्थेमध्ये स्त्रीचे स्त्रीत्व निगडित आहे . यातून स्त्रीवाद ही विचारप्रणाली निर्माण झाली व ही विचारप्रणाली 1975 पासून स्त्रीवादी अभ्यासकांनी भारतातील स्त्रियांचे प्रश्न लक्षात घेऊन स्त्रीवाद मांडला. पण स्त्रीवाद मांडत असताना स्त्री अभ्यासकांनी भारतातील स्त्रियांचे प्रश्न लक्षात घेऊन श्री वाद मांडला पण स्त्रीवाद मांडत असताना स्त्रियांना केंद्रस्थानी ठेवून भारतीय सामाजिक जीवनाचा आणि मानवमुक्तीचा हा एक अविभाज्य भाग आहे .या विचारसरणीतून स्त्री चळवळ पुढे आली , या चळवळीतून जे काही आज पर्यंत नवीन नवीन नवीन प्रश्न निर्माण होत आहेत त्या प्रत्येक प्रश्नांमध्ये स्त्री .पुरुष समानता हा गाभा आहे .कारण भारतीय समाज व्यवस्थेमधील "समाजसत्तावादी" विचारसरणी आणि समाज रचना सर्व प्रकारचे शोषण आणि विषमता नष्ट करील या मांडणीला स्त्रीवाद आणि आव्हान दिलं." यातून स्त्रियांना समान संधी, समान दर्जा, स्वयंनिर्णयाचा अधिकार, राजकीय ,सामाजिक ,आर्थिक ,सांस्कृतिक घटकांमध्ये समानता आणि याकरिता पुरुषप्रधान समाजरचनेशी असलेले विषमतेला चे देऊन समानता आणणे या दृष्टिकोनातून विचार पुढे आला.

"स्त्रीवाद म्हणजे स्त्रियांच्या हक्कांचे आणि अधिकारांचे समर्थन करणारे विचार सूत्र होय". हा विचार स्त्री चळवळीतून पुढे येऊन स्त्रियांना समान दर्जा देऊन समाजामध्ये स्त्री-पुरुषांच्या व्यवस्थेमध्ये सामाजिक बदल झाला. या सामाजिक बदलाची स्त्रीवाद हा सामाजिक दृष्ट्या स्त्रीही लिंग भावानुसार दुय्यम आहे विचारसरणी न मानता ते पासून मुक्त झाली पाहिजे याकरिता निर्णय प्रक्रियेत, आत्मसन्मानाची जाणीव, निरनिराळ्या क्षेत्रात, सामाजिक न्याय यानुसार सामाजिक समता, समाजातील प्रत्येक क्षेत्रात सहभाग हे स्त्रीवादाचे स्वरूप असून स्त्रियांना समानता आणणे हा वैचारिक गाभा आहे.

या वैचारिक गाभा नुसार आज स्त्रियांचे स्थान कुठे आहे ?कारण श्री वादातून समानतेचा आग्रह हा जरी असला तरी पुरुषसत्ताक व्यवस्थेमध्ये स्त्रीवादाची जाणीव आजही राजकीय आहे का ? हा प्रश्न निर्माण होतो याचे उत्तर पाहिले तर स्त्रीच्या दुय्यम ते विषयीचे वास्तव आजही विषमतेवर आधारित आहे कारण समाज परिवर्तनाच्या मार्गावर जाताना "स्त्रिया राजकारणात आणि समाजकारणात उतरल्या यातून स्त्रीमुक्तीच्या कक्षाही रुंदावल्या"3

*Copyright © 2020, Scholarly Research Journal for Humanity Science & English Language*

पण आज श्री दादाचे मूल्यांकन केले तर स्त्रियांचे निर्णय प्रक्रियेतील वास्तवता ही आजच्या स्त्रीवादाचा पुढे एक कळीचा मुद्दा ठरत आहे.

20 व्या शतकापूर्वी स्त्रियांना मतदानाचा अधिकार नव्हता. विसाव्या शतकात जगाच्या राजकारणात दोन मोठी झाली. या प्रक्रियेत जुन्या वसाहतवादी साम्राज्यशाहीचा नारा झाला. "इंग्लंड आणि अमेरिकेसारख्या प्रगत 1919 नंतर स्त्रियांच्या मतदानाचा अधिकार मिळायला सुरुवात झाली. स्विझरलँड सारख्या प्रगत देशात 1970 मध्ये स्त्रियांना मतदानाचा अधिकार मिळाला. विसाव्या शतकात स्त्रीवादी चळवळी सुरू झाल्याचे हे निर्देशक आहे. यानंतर राजकारणात स्त्रियांचा सहभाग वाढू लागला" 6 जगातल्या प्रगत राष्ट्रांमध्ये स्त्रियांना मतदानाचा अधिकार मिळवण्यासाठी त्या देशांच्या स्त्रियांना खूप प्रतीक्षा करावी लागली पण भारतात भारताला स्वातंत्र्य मिळाल्याबरोबर महिलांना मतदानाचा अधिकार प्राप्त झाला ही बाब लक्षणीय आहे.

**राजकीय सहभागाची पार्श्वभूमी**

स्वातंत्र्याच्या 25 वर्षानंतर काम करीत स्त्रियांना समान वेतन देणारा कायदा अस्तित्वात होता आणि बहुतेक उद्योगांमध्ये या तत्त्वांचे उल्लंघन होत आहे विधिमंडळात स्त्री प्रतिनिधत्व अत्यंत कमी होते .त्यातील अनेक कायदे स्त्रियांशी भेदभाव करणारे होते .यावरून देशातल्या स्त्रियांना घटनात्मक समानता असूनही सामाजिक पातळीवर सामाजिक ,शैक्षणिक ,राजकीय व इतर क्षेत्रात स्त्रियांचा दर्जा समान होता .असे दिसून येते सन 1975 पर्यंत जगभर स्त्री-पुरुषांमधील टिकून होती यावेळेस मेक्सिकोतील आंतरराष्ट्रीय परिषदेसाठी 1975 मध्ये हा अहवाल तयार केला होता . या कारणाने भारताची ध्येय धोरणे आंतरराष्ट्रीय पातळीवरील निगडित असल्याने 1974-1975 मध्ये स्त्रियांचा दर्जा यावर विणा मुजुमदार यांनी संशोधन करून विस्तृत अहवाल तयार केला. यातून भारतीय स्त्रियांचा दुय्यम दर्जाची स्थिती स्पष्ट दिसून आली हे संशोधन प्रकाशित झाल्यानंतर दोन शतकांमध्ये झालेल्या स्त्रीवादी सैद्धांतिक मांडणी पाहता बरेच संकलनात्मक बदल घडून आलेले दिसतात. "सन 1975-85 या दशकात पुरुषप्रधान व्यवस्था व तिची भौतिकता तसेच उत्पादन संबंध व पुरुषप्रधान व्यवस्था यावर बराच वैचारिक पोहोच झाला " लोकसभेच्या आजवरच्या सभासदांची यादी पाहिली तर असे दिसते की, सर्व साधारण 30 ते 40 स्त्रिया देशाच्या राजकारणात सातत्याने भाग घेत आल्या आहेत . यातून बहुतांशी तीन ते चार वेळा निवडून आल्या असल्या तरी स्त्रियांचे प्रमाण 90% पेक्षा कमी झाले नाही ही राज्यसभेतील परिस्थिती यापेक्षा वेगळी नाही.

भारतातील एकूण स्त्री लोकसंख्येचे प्रमाण 48 % असले तरी, एकूण स्त्री प्रतिनिधित्व केवळ दहा ते अकरा टक्क्यांपर्यंत गेले होते, राज्यसभेमध्ये देखील सर्वसाधारण तीन परिस्थितीवर असलेली दिसून येते राज्यसभेचा कार्यकाल आतील केवळ 1991-1996 या कालावधीत महिला प्रतिनिधीची संख्या 15% पर्यंत पोचलेली दिसून येते. परंतु उर्वरित कालावधी मात्र महिला प्रतिनिधींची संख्या 11:4 पेक्षा अधिक राहिलेली नाही.

भारतातील स्त्रियांची लोकसंख्या जवळजवळ पुरुषांच्या बरोबरीने असले तरी स्त्रियांच्या 1985 पर्यंत पंचायत राज्य व स्थानिक स्वराज्य संस्थेमध्ये सहभाग नव्हता. असे असले तरी कर्नाटक आणि महाराष्ट्र ही राज्ये आघाडीवर होती. 1983 मध्ये रामकृष्ण हेगडे यांच्या नेतृत्वाखाली जनता पक्षाचे सरकार आले. या निवडणुकीनंतर

रामकृष्ण हेगडे यांनी "कर्नाटक जिल्हा परिषद, आणि मंडल पंचायतीत स्त्रियांसाठी पंचवीस टक्के जागा राखीव ठेवण्याची तरतूद करण्यात आली".

पंचायती राज यांना अधिकाधिक अधिकार देऊन स्वतःचे अधिकार अधिक कमी करण्यासाठी कोणतेही राज्य उस्तुक नव्हती. या कारणास्तव 1988 साली तत्कालीन पंतप्रधान 'राजीव गांधी' यांनी स्त्रियांसाठी मसुदा तयार केला. या मसुद्यात स्वराज्य संस्थेत स्त्रियांच्या प्रतिनिधींमध्ये ते 33% नेमणूक करण्यात यावी अशी शिफारस केली. यास राजीव गांधी सरकारने मान्य करून दिनांक 10 ऑगस्ट 1989 रोजी पंचायत राज्य संस्थांच्या संदर्भातील 64 वी घटना दुरुस्ती विधेयक आणले व मंजूरही केले. या विधेयकास राज्यसभेची मंजुरी नसल्यामुळे पुन्हा हे विधायक बारगळले, यानंतर दिनांक 23 एप्रिल 1993 रोजी राज्यघटनेतील 73 व 74 घटना दुरुस्ती झाली यामुळे अपरिहार्यपणे सर्व राज्यातील स्त्रियांना 33 टक्के आरक्षण देऊ केले. आपल्या देशातील राजकारण पाहिले तर फक्त पुरुषांची मक्तेदारी समजले जात होते. पण या घटना दुरुस्ती नंतर स्थानिक संस्थांमध्ये स्त्रियांना आरक्षणाच्या माध्यमातून संधी मिळाली. यामुळे संपूर्ण देशात सहा लक्ष स्त्रिया ग्रामपंचायत सदस्या 76 हजाराहून अधिक सरपंच आहेत, 37523 पंचायत समितीच्या सदस्या आहेत, तर दीड हजार सभापती आहेत, 31 61 स्त्रिया जिल्हा परिषद समस्या असून 122 च्यावर जिल्हा परिषद अध्यक्ष आहेत. त्याविरुद्ध पदाचा उपभोग घेत असल्या तरी प्रत्यक्षात निवडून जाताना आणि निवडून गेल्यानंतर व पदांचा उपयोग घेत असताना खरोखरच समानतेने वागविले जाते का? तसेच स्त्री म्हणून तिचे स्थान काय आहे? तिला कौटुंबिक, सामाजिक व राजकीय दृष्टिकोनातून कोण कोणत्या समस्यांना तोंड द्यावे लागते? आरक्षणाच्या माध्यमातून स्त्री म्हणून कोणती वागणूक मिळते? स्थानिक स्वराज्य संस्थेमध्ये भूमिका पार पाडताना राजकीय सबलीकरण यामध्ये 'निर्णय' क्षमता ही राजकीय पुरुष व्यवस्थेमध्ये मान्य केली का? हे स्त्रीवादाचा सामाजिक पैलू हा दृष्टिकोन आत्मक हेतू सदर संशोधनामध्ये अपेक्षित आहे.

**संशोधन समस्या**

स्त्री एक व्यक्ती म्हणून केंद्र व राज्य शासन त्यांच्या पक्षाने करण्यासाठी भेटीचा विकासात्मक योजनांची अंमलबजावणी करीत आहेत. अर्थात 1993 मध्ये केलेल्या 73 व 74 व्या घटनादुरुस्तीनुसार स्त्रियांना राजकीय सहभागाला मान्यता मिळाली. तसेच राजकीय निर्णय प्रक्रियेमध्ये सहभागी होण्याची संधी मिळाली, पण त्यांच्या कार्याचे मूल्यमापन करताना स्त्रीवादी चौकटीतून पाहणे गरजेचे आहे. कारण भारतीय समाजामध्ये श्रेष्ठत्वाचा नुसार तो भेदभाव केला जातो. तो भेदभाव हा लिंग भावानुसार पहावयास मिळतो, तेव्हा राजकीय सबलीकरण होत असताना स्त्रीवादी व वंचित घटक या दृष्टिकोनातून पाहिले तर निर्णय क्षमतेतील वास्तवता ही पुरुषशाही वर्गाकडे आहे की राजकीय स्त्रीकडे आहे. या बाबींचा विचार सदरच्या संशोधनातून अपेक्षित आहे.

**संशोधनाची उद्दिष्टे**

1. स्थानिक स्वराज्य संस्था मध्ये प्रतिनिधित्व करणाऱ्या महिलांचे कुटुंबाची राजकीय पार्श्वभूमी अभ्यासणे.

2. स्थानिक स्वराज्य संस्थेमध्ये निर्णय प्रक्रियेतील वास्तवता अभ्यासणे.

*Copyright © 2020, Scholarly Research Journal for Humanity Science & English Language*

**अभ्यास क्षेत्र**

सदर संशोधनासाठी स्थानिक स्वराज्य संस्थेमध्ये प्रतिनिधित्व करणाऱ्या महिलांचा समाजशास्त्रीय अभ्यासासाठी सांगली जिल्ह्याची निवड केलेली आहे. सांगली जिल्ह्यामध्ये एकूण 10 तालुके असून 705 गाव आहेत. तसेच सांगली जिल्ह्याला राजकीय पार्श्वभूमी फार मोठी आहे, त्यामुळे अनेक सामाजिक उपक्रम झालेले आहेत.

**नमुना निवड**

प्रस्तुत शोधनिबंधाकरिता सांगली जिल्ह्यातील स्थानिक स्वराज्य संस्थेमध्ये समाविष्ट असलेल्या जिल्हा परिषद पंचायत समिती, ग्रामपंचायत, नगरपालिका व महानगरपालिका मधून 5 अशाप्रकारे एकूण 2294 महिला प्रतिनिधी राजकीय प्रतिनिधित्व करीत आहेत. या सर्व स्त्रियांचे जनगणना अभ्यास पद्धतीनुसार सर्व महिलांची निवड केलेली असली तरी एकूण 220 महिलांची निवड केलेली असली तरी यापैकी 184 स्त्रियांनी प्रतिसाद दिलेला असल्याने या नमुन्यामध्ये त्यांची कौटुंबिक राजकीय पार्श्वभूमी आणि निर्णय क्षमतेतील वाजत आहे अभ्यासले गेले आहे.

**अनुसूची तंत्र**

प्रस्तुत शोधनिबंधात अधिक सूक्ष्म व वस्तुनिष्ठ व्हावा याकरिता शोध विषयाच्या संदर्भात कौटुंबिक, राजकीय पार्श्वभूमी आणि निर्णय क्षमतेची वास्तवता काय आहे हे अभ्यासले आहे याकरिता अनुसूचिच्या आधारे संबंधित उत्तर दाते यांच्या मुलाखती घेऊन माहिती संकलित करण्यात आलेली आहे.

73 व्या घटना दुरुस्तीमुळे स्त्रियांना राजकारणात सहभागी करून घेतले आहे. त्यांच्या राजकारणातील सहभाग हा स्त्री विकासाचा आणि कल्याणाचा केंद्रभूत आधार मानवायचा का? राजकीय सहभागाच्या अनुषंगाने कोणती पार्श्वभूमी आवश्यक आहे? या सहभागासाठी तिच्या कोणत्या गावी प्रोत्साहन देतात तसेच स्थानिक स्वराज्य संस्थेमध्ये स्त्रियांच्या हातून होत असणाऱ्या कार्यास तिच्या निर्णयांचा राजकीय पुरुषशाही व्यवस्थेमध्ये किती विचार केला जातो हे स्त्रीवादी दृष्टिकोनातून अभ्यासणे गरजेचे आहे.

**तक्ता क्रमांक 1.1 प्रतिसादकाच्या कुटुंबातील निवडणूक लढविलेली व्यक्ती**

| निवडणुक | प्रतिसादकाच्या कुटुंबातील व्यक्ती | टक्केवारी |
|---|---|---|
| लागु नाही | 146 | 77.7 |
| ग्रामपंचायत | 036 | 19.6 |
| जिल्हापरिषद | 001 | 00.5 |
| महानगरपालिका | 004 | 02.2 |
| एकूण | 184 | 100.0 |

प्रतिसादकांचा कौटुंबिक, राजकीय वारसा या बाबत वरील तक्ता क्रमांक 1.1 अनुसार 184 प्रतिसादकांचे कुटुंबांपैकी 143 (77.7%) कुटुंबातील एकही व्यक्ती स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीत उभी राहिली नसल्याने या प्रतिसादकांना कौटुंबिक राजकीय वारसा नाही. परंतु 36 (19.6%) 1(0.5%) व 4(2.2%) प्रतिसादकांच्या कुटुंबातील पुरुष व्यक्ती स्थानिक स्वराज्य संस्थेत निवडणूकीत भाग घेतलेली आहे. तेव्हा असे म्हणता येईल की,

*Copyright © 2020, Scholarly Research Journal for Humanity Science & English Language*

एकूण 184 कुटुंबापैकी केवळ 41 (22.3%) प्रतिसादकांच्या कुटुंबाना राजकारणाच्या प्रक्रियेबाबत माहिती आहे. आणि उर्वरित अधिक 143 (77.7%) प्रतिसादकांना या प्रक्रियेतील माहिती नाही.

**तक्ता क्रमांक 1.2 प्रतिसादकापूर्वी निवडणूक लढविलेली तिच्या कुटुंबातील स्त्री**

| निवडणुक | कुटुंबातील स्त्री | टक्केवारी |
|---|---|---|
| लागु नाही | 179 | 97.3 |
| ग्रामपंचायत | 005 | 02.7 |
| एकूण | 184 | 100.0 |

वरील तक्ता क्रमांक 1.2 नुसार एकूण 184 प्रतिसादकांना पैकी 179 (97.3%) कुटुंबातील एकाही स्त्रीने स्थानिक स्वराज्य संस्थेची निवडणूक लढविलेली नाही. उर्वरित प्रतिसादकांना मात्र कोणत्याही स्वरूपाचा कौटुंबिक राजकीय जबाबदारी आणि कर्तव्य याचे भान असतानाही प्रतिसादकांनी राजकारणामध्ये सहभाग घेतला आहे. त्यामुळे त्यांनी हे आव्हान स्वीकारले.

भारतीय समाजात सर्वत्र क्षेत्रांमध्ये पुरुष प्रधान संस्कृती असल्याने राजकीय क्षेत्रात महिला दिसत असल्या तरी त्यांनी निवडणूक लढवावी की नाही याचा निर्णय त्या महिलेच्या संबंधित असणाऱ्या कुटुंबातील व कुटुंबाबाहेरील असणाऱ्या पुरुष वर्गात घेत असतो हात अनुभव संशोधनात दिसून येतो.

**तक्ता क्रमांक 1.3 प्रतिसादकास राजकीय सहभागाविषयी सल्ला देणाऱ्या व्यक्ती**

| सल्ला देणाऱ्या व्यक्ती | प्रतिसादक | टक्केवारी |
|---|---|---|
| स्वतः | 03 | 01.6 |
| कुटुंबातील पुरुष व्यक्ती | 28 | 15.2 |
| समाजातील व राजकीय पुरुष व्यक्ती | 152 | 42.2 |
| कुटुंबातील महिला सदस्या | 01 | 00.5 |
| एकूण | 184 | 100 |

वरील तक्ता क्रमांक 6.3 नुसार एकूण 184 प्रतिसादकांपैकी केवळ 3 (0.16%) प्रति साधकांनी राजकीय सहभागाचा निर्णय स्वतः घेतला आहे उर्वरितांपैकी केवळ 0.1(0.52) प्रतिसादकांच्या कुटुंबातील महिला सदस्यांनी सल्ला दिलेला आहे. तर 28 (15.2%) प्रतिसादकांना कुटुंबातील पुरुष व्यक्तींनी 152 (82.2%) प्रतिसादकांना समाजातील व राजकीय पुढारी पुरुष व्यक्तींनी राजकीय सहभागासाठी सल्ला दिलेला आहे.

**तक्ता क्रमांक 1.4 प्रतिसादकांच्या राजकीय सहभागाविषयी निर्णय घेणाऱ्या व्यक्ती**

| निर्णय घेणाऱ्या व्यक्ती | प्रतिसादक | टक्केवारी |
|---|---|---|
| स्वतः | 10 | 05.4 |
| कुटुंबातील स्त्री व्यक्ती | 01 | 00.5 |
| कुटुंबातील पुरुष व्यक्ती | 51 | 27.5 |
| राजकीय पुरुष व्यक्ती | 122 | 66.3 |

राजकीय सहभागाविषयी चा निर्णय घेण्यास संदर्भात वरील तक्ता क्रमांक 1.4 नुसार केवळ 10(5.4%) प्रतिसादकांनी स्वतः निर्णय घेतला आहे. 122 (66.3%) प्रति साधकांचा राजकीय सहभागाचा निर्णय समाजातील व राजकीय पुरुष व्यक्तींनी घेतला आहे. यावरून आपण असे म्हणू शकतो की, गरीब महिलांना राजकीय पक्षाने करण्याच्या दृष्टिकोनातून 73 वी घटनादुरुस्ती अस्तित्वात आली असली तरी राजकीय सहभाग आता निर्णय पुरुष घेत आहेत. केवळ कुटुंबातील 51 (27.7%) पुरुष व्यक्तीने महिलांच्या सबलीकरणासाठी व त्यांच्या राजकीय पक्षाने करण्यासाठी अधिक पुढाकार घेतलेला दिसतो.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या वेळेच्या सहभाग होत असताना आणि त्या सभेमध्ये वेगवेगळ्या विकासात्मक व धोरणात्मक बाबी यांच्यावर चर्चा होऊन त्यांची अंमलबजावणी करण्यासाठी काही ठाम निर्णय घ्यावे लागतात. अर्थात स्त्री जेव्हा प्रतिनिधित्व करते ती स्वतः निर्णय घेते की, तिच्या वतीने दुसरे कोणी निर्णय घेतात हे स्त्रीवादी दृष्टिकोनातून खालील थकल्यानंतर स्पष्ट होते.

**तक्ता क्रमांक 1.5 सभेमध्ये निर्णय घेणाऱ्या व्यक्ती नुसार वर्गीकरण**

| निर्णय घेणाऱ्या व्यक्ती | प्रतिसादक | टक्केवारी |
|---|---|---|
| स्वतः | 37 | 20.1 |
| कुटुंबातील पुरुष व्यक्ती | 14 | 07.0 |
| समाजातील व राजकीय पुरुष व्यक्ती | 131 | 71.2 |
| लागु नाही | 02 | 01.6 |
| एकूण | 184 | 100 |

वरील तक्ता क्रमांक 1.5 नुसार प्रतिसादक जेव्हा सभेस हजर असतात, तेव्हा प्रति साधकाच्या वतीने कोण निर्णय घेतात हे पाहणे एक -184 प्रतिसादकांपैकी अधिकतम 131 प्रतिसादकांच्या वतीने समाजातील राजकीय पुरुष व्यक्ती निर्णय घेतात. 37 (20.1%) प्रतिसादक सर्व निर्णय स्वतः घेत आहेत. 2(1.1%) प्रतिसादक कधीच सभेस जात नसल्याने त्यांना हा प्रश्न पडू लागत नाही. प्रतिसादकांचे बैठकीतील निर्णय हे प्रतिसादकांच्या वतीने पुरुष लोक घेत असतात.

याबाबतीत स्त्रीवादी नजरेतून पाहिल्यास प्रिया निर्णय घेण्यास अजूनही सक्षम नाहीत असे समजून स्थानिक स्वराज्य संस्थेतील पुरुषवर्ग निर्णय घेत आहेत असे दिसून येते. तसेच स्त्रियांच्या कडे आजही निर्णय क्षमतेच्या बाबतीत लिंगभाव दृष्टिकोनातून पाहिले जाते आणि लिंग अभावामुळे अजूनही निर्णय प्रक्रियेत सामावून घेतले जात नाही. यावरून स्त्रियांचा अधिक प्रमाणात रबरी स्टॅम्प म्हणून वापर होत आहे.

वरील सर्व मुद्द्यांच्या आधारे आपणास असे म्हणता येणे सदर संशोधनात्मक प्रतिनिधित्व करणाऱ्या महिलांना पुरुषसत्ताक व्यवस्थेचे बाहुले बनविले जात आहे. ही उद्दिष्टे सत्य असल्याचे दिसते.

**निष्कर्ष आणि शिफारशी**

1. स्त्रियांचा स्थानिक स्वराज्य संस्थेमध्ये सहभाग दिसून येत असला तरी प्रतिसादकांना कौटुंबिक व राजकीय वारसा नसताना त्या राजकारणात सक्रिय होऊन आव्हान स्वीकारणे आहे.

2. पुरुषप्रधान संस्कृतीमध्ये आज राजकीय क्षेत्रात महिला दिसून येत आहे पण त्यांनी निवडणूक लढवावी की नाही याबाबतचा निर्णय हा संबंधित असणाऱ्या कुटुंबातील किंवा कुटुंबाबाहेरील पुरुष वर्ग घेत असतो.
3. स्त्रियांना राजकारणात सोनेरी संधी मिळाली असली तरी स्त्रिया हा राजकीय सहभाग पासून किती वंचित होत्या हे दिसून येते.
4. सत्ताही पुरुषभर काशीत संबंधित असल्याकारणाने त्यांना निर्णय प्रक्रियेत भाग समाविष्ट करून घेतले जात नाही केवळ राजकीय सत्तेसाठी त्यांना बाहुले म्हणून वापरले जाते हा कळीचा मुद्दा आज स्त्रीवादी अभ्यासातून अभ्यासला आहे.

**शिफारशी**

1. आज स्त्रिया राजकीय वर्तुळात आल्या पाहिजेत, लोकशाही सुदृढ केली पाहिजे, असे नमूद केले आहे. गावपातळीपासून ते देशपातळीपर्यंत निर्णय प्रक्रियेत ते यांनी सहभागी होऊन स्वतः चा गावाचा, समाजाचा आणि देशाचा विकास साधण्यासाठी योगदान दिले पाहिजे असे झाले, तरच घटनेस अपेक्षित असणार समताधिष्ठित समाज निर्माण होईल.
2. अनेक राजकीय पक्षात पुरुषांचे प्रभुत्व असल्याने निर्णयप्रक्रियेत स्त्रियांना स्थान नाही. म्हणून स्त्रियांच्या राजकीय सक्षमीकरण करण्यासाठी स्त्रियांना स्थान देणाऱ्या राजकीय पक्षात निवडणूक आयोगाने मान्यता द्यावी.
3. स्त्रियांना जात, लिंगभेद व दर्जा या घटकांना समाजात सामोरे जावे लागते तेव्हा पुरुषांनी स्त्रियांच्या समस्या जाणून घेणे व स्त्री ही एक व्यक्ती आहे याची जाणीव ठेवणे आजही गरजेचे आहे.

**सारांश**

प्रतिसादकांच्या कुटुंबाचे राजकीय पार्श्वभूमी नसतानाही प्रतिसादकांचा स्थानिक स्वराज्य राजकीय सहभाग आहे. स्त्री असल्याकारणाने प्रतिसादकास आपल्या कुटुंबात व समाज अनेक समस्यांना तोंड द्यावे लागते, या समस्यांना तोंड देत असतानाही असंख्य अडचणींवर मात करीत कमी कालावधीत स्त्री प्रश्नावर आधारित कार्याची दिशा ठरवली आहे. एक्स व्हिडीओ राजकीय सबलीकरण म्हणून स्त्रीवादी अभ्यासक व सामाजिक पैलू पाहताना राजकीय निर्णय क्षमतेत वास्तव हे राजकीय पुरुषही वर्गाकडे जास्त प्रमाणात दिसून येते. निर्णय प्रक्रियेत त्यांना सामावून घेतले जात नाही ही बाब आजही गंभीर आहे.

**संदर्भ ग्रंथसूची**

*भागवत विद्युत, 2008, स्त्रीवादी सामाजिक विचार, डायमंड पब्लिकेशन, पुणे.*
*भागवत विद्युत, व परदेशी प्रतिमा (संपादक) 1998, अब्राह्मणी स्त्रीवादी इतिहास लेखनाच्या दिशेने, स्त्री अभ्यास केंद्र पुणे विद्यापीठ पुणे.*
*देव. वि. रा., 2002, स्त्री चळवळीची वाटचाल, सुगावा प्रकाशन, पुणे.*
*गोऱ्हे नीलम, 1997, नारी पर्व, विद्या प्रकाशन, पुणे.*
*गवाणकर रोहिनी, 1986, मराठी स्त्रीशक्तीचे राजकारणी रूपे, साधना प्रकाशन, मुंबई.*
*मोघे किरण, 1997, महिला आरक्षण विधेयकाचा साठी लढा, अखिल भारतीय जनवादी महिला संघटना, महाराष्ट्र राज्य समिती.*
*पोरे कुमुद, 1993, राजकारणात स्त्रियांचा सहभाग: रूपे आणि प्रक्रिया, women in politics: forms and proceses, या पुस्तकाचा अनुवाद, शरदचंद्र फ्रेड्रिक एबर्ट स्टिफ्तुंग, नवी दिल्ली.*

*Copyright © 2020, Scholarly Research Journal for Humanity Science & English Language*

*पाटील भारती, 1998, अंक 12 वा, स्त्रियांचा सत्तेतील सहभाग सबलीकरणाच्या प्रक्रियेत महत्त्वाचा टप्पा, समाजवादी प्रबोधिनी, इचलकरंजी.*

**इंग्रजी ग्रंथ**

*Austin Gayle, 1990, Feminist Theories for Dramatic Criticism, The University of Michigan press, United status of America.*
*Agnew Vijay, 1986, Elite Women in Indian Politics, Shakti Books, Delhi.*
*Desai Leela, 2004, Issues In Feminism, Pointer Publishers, Jaipur.*
*Meenakshi J. C. Edited 207, Women and Panchayat Raj, Omega Publications: New Delhi.*
** Journals:-*
*Bhag, Bhargav B.S. and Vidya K.C. Position of women in Political institutions: With Special refrence to*
*Panchayat Raj system in Karnataka, Journal of Rural Development NRD, Hyderbad.*
*Gala Chetana, 1987, the Ladies Pannel:Report from Maharashtra, Maushi,No. 42-43.*

**Website**

*WWW.SDnp.undp. Gender/Feminism*
*WWW.Sangli district*
*WWW. Maharashtra Sangli/city*

*Copyright © 2020, Scholarly Research Journal for Humanity Science & English Language*